■ वर्ष- १२ ■ अंक- २६ ■ मुंबई, मंगळवार,१२ मे २०२६ ते १८ मे २०२६ ■ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027

मूल्य २/- रुपये

PG|2

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

नराधमी विकृतीचे वासनाकांड...!

3 → सिंहस्थाच्या वाटेवरील हिरवाई भुईसपाट!

कधी कृष्णाचा अवतार, तर कधी शिवाचा... ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

बेवारस बाळामागे दोन प्रेम प्रकरणांचे गुंतागुंतीचे जाळे; पोलिसांकडून अल्पवयीन आईसह तिच्या दोन्ही प्रियकरांवर कारवाई



मुंबई : काही दिवसांपूर्वी माहिममधील एका फुटपाथवर बेवारस अवस्थेत सापडलेल्या नवजात मुलीच्या प्रकरणाचा गुंता पोलिसांनी यशस्वीरित्या उलगडला आहे. या प्रकरणाच्या सखोल तपासातून दोन वेगवेगळ्या प्रेमप्रकरणांचे गुंतागुंतीचे जाळे समोर आले आहे. यामुळे पोलिसांनी बाळाची अल्पवयीन आई तसेच तिचा सध्याचा आणि आधीचा प्रियकर या तिघांवरही कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. या संपूर्ण घडामोडींमध्ये, एका बाजूला बाळाला बेवारस सोडल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तर दुसऱ्या बाजूला फ्छत्र परिसरात अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी तिच्या आधीच्या प्रियकरावर स्वतंत्र गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. सदर घटना 3 मे रोजी संध्याकाळी घडली. माहिममधील एका नामांकित शाळेजवळ राहणारे एक स्थानिक रहिवासी आपल्या कुत्र्याला फिरायला घेऊन गेले असताना त्यांना फुटपाथवर निळ्या आणि गुलाबी रंगाच्या कपड्यांमध्ये गुंडाळलेली एक नवजात मुलगी बेवारस अवस्थेत आढळून आळी. यासंदर्भात माहिती मिळताच माहिम पोलिसांनी त्या बाळाला तातडीने सायन रुग्णालयात दाखल केले होते. त्यानंतर बाळाची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र फुटपाथवर बेवारस बाळ सापडल्यामुळे पोलिसांनी प्राथमिक चौकशीनंतर सुरुवातीला अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली होती. सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी तपासाची सूत्रे मध्य मुंबईतील एका भाड्याच्या घरापर्यंत पोहचली.

तिथे त्यांनी बाळाची 17 वर्षीय अल्पवयीन आई आणि तिचा सध्याचा प्रियकर या दोघांना ताब्यात घेतले. त्या दोघांची चौकशी केली असता जी गोष्ट समोर आली, ती ऐकून पोलीसही थक्क झाले. अल्पवयीन मुलीने पोलिसांना सांगितले की, यापूर्वी फ्छत्र परिसरात राहत असताना तिचे एका 25 वर्षीय तरुणाशी प्रेमसंबंध होते. ती गर्भवती राहिल्यानंतर जेव्हा तिने त्या तरुणाकडे लग्नाचा आग्रह धरला, तेव्हा त्याने तिच्या चारित्र्यावर संशय घेत तिला सोडून दिले होते. सामाजिक बदनामी आणि अपमानापासून वाचण्यासाठी तिच्या कुटुंबीयांनी तिला मध्य मुंबईत हलवले.

तिथेच 19 मार्च रोजी तिने या मुलीला जन्म दिला. मध्य मुंबईत असताना त्या अल्पवयीन मुलीची ओळख आणखी एका तरुणाशी झाली. तिच्या सध्याच्या प्रियकराने तिच्याशी लग्न करण्याचे वचन दिले, परंतु त्याने बाळाचा त्याग करावा लागेल, अशी अटक घातली होती. त्यानुसार त्या जोडप्याने 3 मे रोजी माहीम येथील फुटपाथवर नवजात बाळाला सोडून देण्याचा कट रचला. माहीम पोलिसांनी बाळाला सोडून दिल्याप्रकरणी मुलीच्या सध्याच्या प्रियकराला अटक केली असून, अल्पवयीन असलेल्या त्या मातेला एका आश्रयगृहात पाठवण्यात आले आहे. याव्यतिरिक्त, आरसीएफ पोलीस ठाण्याला माहिती मिळताच मुलीच्या माजी प्रियकरावर बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन बाळाचा पिता कोण? हे कायदेशीररित्या निश्चित करण्यासाठी आणि सर्व आरोपींवर कठोर कारवाई सुनिश्चित करण्यासाठी बाळ, त्याची आई आणि माजी प्रियकर यांची डीएनए चाचणी केली जात आहे.

मुंबई साखळी बॉम्बस्फोटांच्या कटात पाकिस्तानी लष्कराचा हात

12 दोषींना कारावासाची शिक्षा



नवी दिल्ली। जामनगर येथील 'टाडा' न्यायालयाने एका अत्यंत गंभीर कटाशी संबंधित खटल्यात ऐतिहासिक निकाल दिला आहे. पाकिस्तानमधून शस्त्रास्त्रांची एक मोठी खेप गुजरातच्या किनारपट्टीवर उतरवून, त्याद्वारे 1993 च्या मुंबई साखळी बॉम्बस्फोटांसह देशभरात जातीय हिंसाचार भडकवण्याचा कट रचण्यात आला होता. या घटनेप्रकरणी न्यायालयाने तीन दशकांनी 12 आरोपींना दोषी ठरवून त्यांना कारावासाची शिक्षा सुनावली आहे. आपल्या निकालात विशेष 'टाडा' न्यायाधीश रॉबिन पी. मोगेरा यांनी हे स्पष्टपणे अधोरेखित केले की, भारताच्या विरोधातील या मोठ्या कारवायांमध्ये पाकिस्तानी नौदल आणि त्या देशाचे लष्करी अधिकारी थेट सहभागी होते. हे संपूर्ण नेटवर्क फरार असलेला 'अंडरवर्ल्ड डॉन' दाऊद इब्राहिम आणि टायगर मेमन यांच्या इशाऱ्यावर कार्यरत होते. जुलै 1993 मध्ये दाखल करण्यात आलेल्या या खटल्यात प्रदीर्घ कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने 12 जणांना शिक्षा सुनावली आहे, तर त्याचवेळी, पुराव्यांच्या अभावामुळे अन्य 17 जणांची निर्दोष मुक्तता करण्याचे आदेश दिले आहेत.

न्यायालयाने दोषी ठरवलेल्या गुन्हेगारांपैकी सलीम कुत्ता आणि मामुमिया पंजुमिया या प्रत्येकाला सात वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तर या दोघांव्यतिरिक्त, उस्मान उमर कोरेजा, मोहम्मद अली, हारून आदम, अहमद इस्माईल ओलिया, आरिफ लखानी, इफ्तेखार अन्सारी, मोहम्मद अयुब अन्सारी, लखमन अहिर, इस्तियाक अहमद आणि कादिर अहमद शेख या 10 जणांना पाच वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. विशेष सरकारी वकील गोखानी यांच्या माहितीनुसार, शिक्षा सुनावताच सर्व दोषींना तत्काळ ताब्यात घेण्यात आले आणि त्यांची रवानगी कारागृहात करण्यात आली आहे. याच खटल्यात, न्यायालयाने दाऊद इब्राहिम, अनीस इब्राहिम, छोटा शकील आणि टायगर मेमन यांच्यासह 15 प्रमुख आरोपींना 'फरार गुन्हेगार' म्हणून घोषित केले आहे. हे आरोपी सध्या पाकिस्तान आणि संयुक्त अरब अमिराती मध्ये लपून बसल्याचे मानले जाते.

भारताला अस्थिर करण्याचा हा 'पूर्वनियोजित कट' दुबई येथील दाऊद इब्राहिमच्या निवासस्थानी रचण्यात आला होता, हे सिद्ध करण्यात सरकारी पक्षाला न्यायालयात यश मिळाले आहे. या कटाचा उद्देश बाबरी मशिदीच्या विध्वंसानंतर देशांतर्गत जातीय तणाव भडकवण्याच्या हेतूने समुद्री मार्गे भारतात आरडीएक्स, रायफल्स आणि ग्रेनेड्ससारखी प्राणघातक शस्त्रे तस्करी करून आणणे हा होता. या तपासादरम्यान ही बाबही उघडकीस आली की, पाकिस्तानच्या 'मरीन सिक्युरिटी एजन्सी'ने या शस्त्रांच्या वाहतुकीसाठी सक्रियपणे मदत केली होती. निवृत्त आयपीएस अधिकारी पी.के. झा आणि सतीश वर्मा, तसेच सध्याचे सीबीआय विशेष संचालक मनोज शशीधर यांनी या अत्यंत संवेदनशील प्रकरणाच्या तपासात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी गोळा केलेले पुरावे आणि साक्षीदारांच्या जबानीमुळे या गुन्हेगारांना कायद्याच्या कचाट्यात आणणे शक्य झाले आहे.

तपास अहवालानुसार, या आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीतील 'अंतिम दुवा' म्हणून जामनगर आणि कच्छ येथील काही स्थानिक व्यक्तींचा वापर करण्यात आला होता. मुस्तफा दोसा याची 'सदा-अल-बहार' ही नौका कराचीजवळच्या खोल समुद्रात पाठवण्यात आली होती. तिथे पाकिस्तानच्या मरीन सिक्युरिटीच्या एका जहाजावरून स्फोटकांचा प्रचंड साठा आणि सुमारे 150 अत्याधुनिक शस्त्रे या नौकेवर चढवण्यात आली. कराचीहून निघालेल्या या साठ्याचे त्यानंतर दोन भागात विभाजन करण्यात आले. एक भाग महाराष्ट्राकडे पाठवण्यात आला, तर दुसरा भाग गुजरातच्या पोरबंदर-वेरावळ किनारपट्टीवर उतरवण्यात आला. गोसाबारा पुलाजवळ उतरवण्यात आलेली ही शस्त्रे त्यानंतर ट्रक्सद्वारे सुरत, वलसाड आणि अगदी उत्तर प्रदेशपर्यंत पोहोचवण्यात आली. 1993 ते 2018 या प्रदीर्घ कालावधीत चाललेल्या तपासानंतर 2019 मध्ये या प्रकरणाचे अंतिम दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आणि या संपूर्ण प्रक्रियेचा परिपाक म्हणून आता या प्रकरणावर न्यायाची मोहोर उमटली आहे.

1. इमारत क्रमांक (नगरपालिका किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा जनगणना क्रमांक)
2. जनगणना घर क्रमांक
3. जनगणना घराच्या जमिनीचे मुख्य साहित्य
4. जनगणना घराच्या भिंतींचे मुख्य साहित्य
5. जनगणना घराच्या छताचे मुख्य साहित्य
6. जनगणना घराचा वापर (जसे की निवासी, व्यावसायिक)
7. जनगणना घराची स्थिती
8. कुटुंब संख्या
9. कुटुंबामध्ये सर्वसाधारण वास्तव्य करणाऱ्या व्यक्तींची एकूण संख्या
10. कुटुंबप्रमुखाचे नाव
11. कुटुंबप्रमुखाचे लिंग
12. कुटुंबप्रमुख अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / इतरपैकी आहे का? जन कल्याण
13. जनगणना घराच्या मालकीची स्थिती
14. कुटुंबाच्या पूर्णपणे ताब्यात असलेल्या निवासी खोल्यांची संख्या
15. कुटुंबात राहणाऱ्या विवाहित जोडप्यांची संख्या
16. पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत
17. पिण्याच्या पाण्याच्या स्रोताची उपलब्धता
18. प्रकाशाचा मुख्य स्रोत
19. शौचालयाची उपलब्धता
20. शौचालयाचा प्रकार
21. सांडपाणी निचऱ्याची व्यवस्था
22. स्नानाच्या सुविधेची उपलब्धता
23. स्वयंपाकघराची आणि एलपीजी/पीएनजी जोडणीची उपलब्धता
24. स्वयंपाकासाठी वापरले जाणारे मुख्य इंधन
25. रेडिओ/ट्रान्झिस्टर
26. दूरचित्रवाणी
27. इंटरनेटची उपलब्धता
28. लॅपटॉप/संगणक
29. दूरध्वनी/मोबाइल फोन/स्मार्टफोन
30. सायकल/स्कूटर/मोटारसायकल/मोपेड
31. कार/जीप/व्हॅन
32. कुटुंबामध्ये प्रामुख्याने सेवन केले जाणारे धान्य
33. मोबाइल क्रमांक (केवळ जनगणनेशी संबंधित गनेशी संबंधित संवादासाठी)

तब्बल 15 वर्षांनंतर देशभरात जनगणनेचा प्रारंभ, दोन टप्प्यात जनगणना

तुम्हाला जनगणनेत विचारले जाणार हे प्रश्न... अगोदरच समजून घ्या प्रक्रिया!

मुंबई, आगामी जनगणना 2027 साठी सरकार व्यापक तयारी करत आहे. देशाची 16 वी जनगणना महत्त्वपूर्ण राष्ट्रीय मोहीम असून जनगणना कायदा 1948 च्या तरतुदीअंतर्गत ती संपूर्ण देशभरात राबवली जाईल. आता या जनगणनेत नेमकं काय काय केलं जाणार? नागरिकांकडून कशाची माहिती घेतली जाणार? हे समोर आले आहे. याबाबतची सविस्तर माहिती सरकारने दिली आहे.

डिजिटल उपक्रम

सरकारच्या डिजिटल इंडिया उपक्रमाच्या वचनबद्धतेशी सुसंगत राहून जनगणना 2027 मध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा व्यापक वापर केला जाणार आहे. यामुळे गुणवत्ता, कार्यक्षमता वाढण्याबरोबरच माहिती संकलन वेळेत पूर्ण होईल.

अधिक अचूकता आणि गती साध्य करण्याच्या उद्देशाने, पूर्णपणे डिजिटल माध्यमांद्वारे राबवली जाणारी ही देशाची पहिलीच जनगणना असून डिजिटल कार्यप्रणालीच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण स्थित्यंतर मानले जात आहे .

या प्रणालीमध्ये ह्यरिअल-टाइमह्ल माहिती संकलनासाठी मोबाईल ॲप्लिकेशन्सचा वापर केला जाईल. व्यापक देखरेख, पर्यवेक्षण आणि डेटा व्यवस्थापनासाठी सीएमएमएस (जनगणना देखरेख आणि व्यवस्थापन प्रणाली) हे वेब पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे.

यंदाच्या जनगणनेत ऑनलाईन स्वयं गणना पर्याय उपलब्ध करून देण्यात आला असून याअंतर्गत व्यक्ती स्वतःच आपल्या कुटुंबाची जनगणना प्रश्नावली ऑनलाइन पद्धतीने भरून, पूर्ण करून सादर करू शकते.

प्रशासकीय पूर्वतयारी :

जनगणना 2027 साठी राज्यातील सर्व जिल्हे/तालुके /शहरे/गावे यांच्या प्रशासकीय सीमा 1 जानेवारी 2026 ते 31 मार्च 2027 या कालावधीसाठी प्रशासकीय सीमा गोठवण्यात आल्या आहेत, म्हणजेच त्यात कुठलेही बदल करता येणार नाहीत.

महाराष्ट्र शासनाने या संदर्भातील राजपत्र अधिसूचना 15 जुलै 2025 रोजी प्रसिद्ध केली आहे.

त्यानंतर 23 डिसेंबर 2025 रोजी राज्य शासनाने जनगणना अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबतची अधिसूचना प्रकाशित केली, याद्वारे क्षेत्रीय कार्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक राज्य/जिल्हा/वैधानिक शहर/तालुका स्तरावरील प्रशासकीय यंत्रणा उभारण्यात आली.

राज्य शासनाने 16 फेब्रुवारी 2026 रोजी खालील 33 प्रश्न अधिसूचित केले आहेत. गृह यादी टप्प्यात लोकांना हे प्रश्न विचारले जातील. यातून घराची स्थिती, सोयी-सुविधा आणि घरगुती मालमत्ता यांविषयीची माहिती संकलित करण्याची प्रक्रिया अधिक सुव्यवस्थित होईल.

महाराष्ट्र सरकारच्या निर्णयानुसार महाराष्ट्रात जनगणनेचा पहिला टप्पा म्हणजे "घर-यादी आणि घरगणना" साठीच वेळापत्रक खाली दिल्याप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.

- स्व-गणना : 1 मे ते 15 मे 2026
- घर-यादी आणि घरगणना : 16 मे ते 14 जून 2026

या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी तसेच राज्यभरात जनगणनेशी संबंधित उपक्रम सुरु करण्याच्या उद्देशाने 26 फेब्रुवारी 2026 रोजी राजपत्रित अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

क्षेत्रीय पदाधिकारी तैनात करण्यात आले आहेत.

या व्यापक घरगणना तयार करण्याच्या कामासाठी राज्यभरात सुमारे 2.64 लाख क्षेत्रीय अधिकारी म्हणजेच प्रगणक आणि पर्यवेक्षकांना (10% राखीव कर्मचाऱ्यांसह) प्रशिक्षण दिले जाईल आणि प्रत्यक्ष जणगणनेसाठी तैनात केले जाईल.

याव्यतिरिक्त हे कार्य वेळेत पूर्ण करण्याच्या उद्देशाने तांत्रिक सहायक आणि विविध कार्यकुशल कर्मचाऱ्यांना राज्य, जिल्हा, वैधानिक शहरे आणि तहसील स्तरावर नियुक्त करण्यात आले आहे.

भारताचे रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्त यांच्या कार्यालयाने निर्देशित केलेल्या प्रशिक्षण श्रृंखलेनुसार प्रशिक्षणाचे पाच स्तर निश्चित करण्यात आले आहेत. सर्वप्रथम, भारताचे रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्त यांच्या कार्यालयामधील विषय तज्ञांनी राज्य जनगणना संचालनालयांमधील राष्ट्रीय प्रशिक्षकांना प्रशिक्षण दिले आहे.

दुसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रातील 141 मास्टर प्रशिक्षकांना (राज्य सरकारचे 115 आणि जनगणना कार्यालय, महाराष्ट्र येथील 26) पुण्यात यशदा अर्थात यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन अकादमी येथे दिनांक 9 ते 17 मार्च 2026 या कालावधीत प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात जनगणना कार्य संचालनालय, महाराष्ट्र, येथील 5 राष्ट्रीय प्रशिक्षकांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर झालेल्या प्रशिक्षणात 6 ते 17 एप्रिल 2026 या कालावधीत सर्व जिल्हा/वैधानिक शहरांमधील मुख्यालयात 3,850 क्षेत्रीय प्रशिक्षणार्थीना मास्टर प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण देण्यात आले.

शेवटच्या टप्प्यात 23 एप्रिल ते 8 में 2026 या कालावधीत क्षेत्रीय प्रशिक्षक सुमारे 2.64 लाख प्रगणक 2.64 लाख प्रगणक आणि पर्यवेक्षकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

आणि पर्यवेक्षकांना प्रशिक्षण दे हे प्रगणक आणि पर्यवेक्षक प्रत्यक्ष क्षेत्रीय कामकाजात सहभागी होतील आणि ह्यघर-यादी आणि घरगणना 'म्हणजे ह्यएच एल ओ' मोबाईल ॲप्लिकेशन मध्ये माहिती संकलित करतील.

जनगणनेमधील लोकांची भूमिका

राज्याचा सर्वांगीण विकास आणि प्रगतीमध्ये योगदान देण्याच्या उद्देशाने तसेच परिणामकारक धोरण निर्मितीसाठी विश्वसनीय डेटा किंवा माहिती संकलित करण्यात लोकांचा सक्रिय सहभाग अतिशय आवश्यक आहे.

महाराष्ट्र सरकारने 9 एप्रिल 2026 रोजी एक राजपत्रित अधिसूचना जारी करुन राज्यातील नागरिकांना भारताच्या जनगणना 2027 मध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे तसेच या राष्ट्रीय हिताच्या महत्त्वपूर्ण कार्यात योगदान देण्याचे आवाहन केले आहे. प्रत्यक्ष क्षेत्रीय भेटीत घरोघरी येणाऱ्या जनगणना अधिकाऱ्यांना अचूक आणि वेळेवर माहिती देऊन संपूर्ण सहकार्य करण्यासाठी लोकांना प्रोत्साहित केले जात हे 27 साल स्वगणना करणाऱ्या नागरिकांनी हे सुनिश्चित करावे की ते https://se.census.gov.in या योग्य युआरएल ॲड्रेसलाच भेट देत आहेत तसेच ज्या एसएमएस/ई-मेल श्रेणीतून वन टाइम पासवर्ड (ओटीपी) प्राप्त झाला आहे, त्या श्रेणीचे वर्णन योग्य असल्याची खात्री करावी आणि इतर कोणत्याही श्रेणीतून प्राप्त झालेल्या रटर ला प्रतिसाद देऊ नये.

एसएमएस /ओटीपी द्वारे प्राप्त झालेल्या जनगणनेशी संबंधित सर्व संदेशांमध्ये प्रेषकाच्या नावात RGICEN हा कीवर्ड असतो, उदा. AD-RGICEN-S, BD-RGICEN-S, RGICEN-G, JK-RGICEN-G इत्यादी.

दुसऱ्या टप्प्यात

दरम्यान, दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्येची सविस्तर माहिती नोंदवली जाईल. यामध्ये वय, शिक्षण, व्यवसाय, स्थलांतर यासह जातीनिहाय माहिती देखील गोळा केली जाणार आहे. एप्रिल ते सप्टेंबर 2026 दरम्यान पहिला टप्पा पार पडणार असून, देशातील 36 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश, 6.3 लाखांहून अधिक गावे यांचा ही समावेश असेल. सोबतच लीव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्यांना विवाहित मानले जाणार असल्याचा मोठा निर्णय देखील या संदर्भात घेण्यात आला आहे. एकूण 33 प्रश्न यंदा जनगणनेसाठी निच्छित केले आहे. दरम्यान हे प्रश्न नेमके कोणते हे आपण समजून घेऊ.

माहितीची सुरक्षितता:

मोबाईल स्तरावर, डेटा प्रेषणाच्या दरम्यान तसेच सर्व्हर स्तरावर अशी त्रिस्तरीय सुरक्षा प्रणाली समाविष्ट करण्यात आली आहे. केवळ नियुक्त अधिकाऱ्यांनाच पासवर्ड आणि ओटीपी द्वारे या माहितीचा एक्सेस दिला जाईल आणि डेटा एनक्रिप्टेड स्वरूपात संग्रहित केला जाईल.

ISO/IEC 27001:2022 प्रमाणित डेटा सेंटर्सना महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा म्हणून घोषित करण्यात आले आहे आणि नामांकित संस्थांमार्फत सुरक्षा ऑडिट केले जात आहे.



नराधमी विकृतीचे 'वासनाकांड'...!

उमलत्या कळ्याच कुस्करल्या: ज्येष्ठांची वासनांध प्रवृती घातक; षंढ प्रशासनही कारणीभूत

आ या बहिणीकडे वाईट नजरेने पाहिल्यास त्या नराधमाला थेट हत्तीच्या पायाखाली देण्याची अथवा त्याचा कडेलोट करण्याची शिक्षा याच महाराष्ट्रात छत्रपती श्री शिवाजी महाराजांनी सुरु केली होती. त्यामुळे त्याकाळात महिला सुरक्षित होत्या; मॉसाहेब जिजाऊंचा आदेश आणि शिवरायांची छत्रछाया यामुळे त्याकाळातील शिवकन्या मोठ्या थाटामाटात आणि रुबाबात वावरत होत्या. त्याच महाराजांच्या कर्तृत्वाचा दबदबा आजही केवळ महाराष्ट्रात नव्हे तर जगाच्या नकाशावर जाऊन पोचला आहे.याच काळात 'हिरकणी' सारख्या रणरागिनी बिनधास्तपणे वावरत होत्या; परंतु शिवरायांच्या याच महाराष्ट्राला काळीमा फासण्याचे दुष्कृत्य एका नराधमाने केले आहे. स्वराज्याची स्थापना करताना शिवरायांना भोर तालुक्यातील मावळयांनी सर्वाधिक साथ दिली होती; या मावळयांच्या सोबतीनेच महाराजांनी स्वराज्याची पताका भक्कमपणे रोवली होती. मात्र; दुर्दैवाने याच तालुक्यातील नसरापूर येथील एका पासष्ट वर्षीय नराधमाने एका उमलत्या कळीवर अत्याचार करुन तिचा निघृणपणे खून केला. त्याच दिवशी चाकण येथेही अशाच प्रकारच्या घटनेची पुनरावृत्ती झाली; तर त्यापाठोपाठ थेऊर आणि पुण्यातील पर्वती येथे घडलेल्या चिमुरड्यांच्या अत्याचार प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. धक्कादायक म्हणजे पर्वती येथील घटनेत तर सख्ख्या आजोबानेच नातीवर अत्याचार करण्याचा दुर्दैवी प्रयत्न केला आहे; या घटनांमुळे संतप्त झालेले नागरिक विशेषत: तरुणी आणि महिला थेट रस्त्यावर उतरल्या होत्या. मात्र; त्यांना दिलासा देण्याच्या ऐवजी त्यांना लाठीचाराचा 'प्रसाद' देण्याचे महापाप मायबाप सरकारने आणि त्यांच्या पोलीसी बगलबच्च्यांनी केले आहे. लहानग्या चिमुरड्यांवर अत्याचार होत असतानाच मायबाप सरकार 'बुवाबाजी' त अडकले आहे; महाराष्ट्रात संतापाची लाट असतानाच स्वत: गृहमंत्री असलेले मुख्यमंत्री मंत्रीमंडळासह एका किर्तनकार महाराजांच्या मुलीच्या लग्नात अडकले होते. त्यातूनच घटनांच्या बाबतीत सरकार किती उदासीन याची स्पष्टपणे जाणीव होत आहे; या घटनांचा तपास 'फास्ट ट्रॅक' पद्धतीने केला जाईल आणि या नराधमांना किरकोळ शिक्षाही मात्र; ही वासनांध विकृती रोखण्यासाठी शासन अथवा न्यायालयीन यंत्रणेकडे फारसे 'हत्यार' निश्चितपणे नाही. त्यामुळे हे नराधम या कायद्यातून एखादी छोटीशी पळवाटही शोधतील; परंतु या कुस्करलेल्या कळया पुन्हा उमलणार नाहीत हे निश्चित. त्यासाठी या नराधमांना भर चौकात फाशी देणे हीच खरी शिक्षा ठरणार आहे; अन्यथा पेटलेला समाज अशा नराधमांना भर चौकात ठेचून मारल्याशिवाय राहणार नाही हे निश्चित.

धगधगत निर्भया अशा आहे होइल. प्रभावी



छत्रपती श्री शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह अनेक महापुरुषांनी याच भूमीत जन्म घेतला आहे; याच भूमीतील भगवान गौतम बुद्धांनी संपूर्ण जगाला शांततेचा संदेश दिला आहे. त्याशिवाय संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, जगदगुरु श्री तुकाराम महाराज यांच्या पदस्पर्शाने महाराष्ट्राची भूमी पावन झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्राची गणना संतभूमी आणि देवभूमी म्हणूनही होत आहे; परंतु गेल्या काही वर्षांच्या याच पुरोगामी महाराष्ट्राला काही नराधमांनी काळीमा फासण्याचे महापाप केले आहे. विशेष म्हणजे त्यांची वासनांध विकृती सातत्याने उफाळून येत आहे; त्यातच या वासनांध विकृतीत ज्येष्ठ नागरिकांचा वाढता सहभाग ही निश्चितच खेदजनक बाब म्हणावी लागेल. गेल्या काही वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्राचा विकास झपाट्याने होत आहे; उद्योगधंदे उभे राहिल्याने याच महाराष्ट्रात परप्रांतीयांची संख्या वेगाने वाढत आहे. परंतु हाच वेग दुर्दैवाने महाराष्ट्रासाठी आणि विशेषत: महिला आणि तरुणींसाठी घातक ठरत आहे; गेल्या काही वर्षांच्या कालावधीत महिला आणि तरुणीवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून महिला आणि तरुणींना फूस लावून पळवून नेण्याच्या प्रकारात वाढ होत आहे. गेल्या काही महिन्यांपूर्वी दौड तालुक्यातील कुरकुंभ मधील एका 'लव्ह जिहाद' सारख्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली होती; धक्कादायक म्हणजे या घटनेला काही महिन्यांचा कालावधी उलटला असतानाही मायबाप सरकारने हे प्रकरण फारसे गांभीर्याने घेतलेले नाही. विशेष म्हणजे या नराधमांनी या तरुणीवर दबाव टाकत तिला जबाब बदलण्यास भाग पाडले होते; त्यातूनच हे 'लव्ह जिहाद'चे प्रकरण समाजासाठी विशेषत: महिला आणि तरुणींसाठी किती घातक आहे हे स्पष्ट होते.

गुन्हेगारीचे भीषण वास्तव

- वर्ष: बलात्कार, पोक्सो गुन्हे: विनयभंग
- २०२५: २९९: २९७
- २०२६(जानेवारी ते मार्च): ५०: ६६

प्रमुख शहरातील लैंगिक अत्याचाराची आकडेवारी

- दिल्ली: १, ०८९
- जयपूर: ४९७
- मुंबई: ४११
- हैदराबाद: ३५८
- पुणे: २४४







सोशल मिडियाही कारणीभूत

- गेल्या काही वर्षांच्या कालावधीत मोबाईल आणि त्यावरील सोशल मिडियाने चांगलाच धुमाकुळ घातला आहे; सोशल मिडियावरील काही बाबी या समाजासाठी निश्चितच प्रेरणादायी आहेत. परंतु समाज या चांगल्या गोष्टी स्विकारायलाच तयार नाही; सोशल मिडियावरील विकृती जोपासण्याचे आणि त्या फॉरवर्ड करण्याचे महापाप समाजाच्या माध्यमातून होत आहे. त्यातूनच समाजाची वासनांध विकृती अधिकच बळावत चालली आहे; धक्कादायक म्हणजे या विकृतीला लहान मुलेही बळी पडत असून भावी पिढीसाठी ही बाब निश्चितच चिंताजनक अशीच म्हणावी लागेल.

देवाभाऊ हे पटते का ?

- संपूर्ण महाराष्ट्र बुवाबाजीला बळी पडत आहे; त्याला राज्यकर्तेही अपवाद राहिलेले नाहीत. भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात प्रकरणात तर अनेक राज्यकर्ते अडकले आहेत; काहींना तर थेट आपल्या पदांचा राजीनामा द्यावा लागला असून काही राज्यकर्ते थेट 'जात्यात' अडकले आहेत. या भोंदूबाबांच्या कारनाम्याने अनेक राज्यकर्त्यांच्या पाठीमागे चौकशीचा ससेमिरा लागला आहे; त्यातच या घटना घडल्याने संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. मात्र; या पिडीत मुलीच्या कुटुबांच्या सांत्वनाला जाण्याच्या ऐवजी 'शिस्तबद्ध' मुख्यमंत्री अशी प्रतिमा असलेल्या देवेंद्र फडणवीस यांनी एका महाराजांच्या मुलीच्या लग्नाला हजेरी लावणे पसंत केले. त्यामुळे देवाभाऊ तुम्हाला हे पटते का असा खोचक सवाल आता सर्वसामान्य जनता करत आहे.

न्याय मागणेही चुकीचेच

- भोर तालुक्यातील नसरापूर येथील घटनेने संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला होता; या गावातील स्थानिक नागरिकांनी थेट बंगळूर महामार्ग रोखून धरत निषेध व्यक्त केला होता. विशेष म्हणजे या आंदोलनाचे नेतृत्व तरुणी आणि महिलांनी केले होते; त्यानंतर या मुलीचा मृतदेह अंत्यसंस्काराला नेताना संतप्त महिला आणि नागरिकांनी नवले पूलावर उस्फूर्त आंदोलन करत प्रशासन आणि पोलीसांना धारेवर धरले होते. त्यानंतर पर्वती येथील घटनेनंतरही संतप्त महिलांनी थेट पर्वती पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन केले होते; या नराधमांना फाशी द्या एवढीच माफक अपेक्षा त्यांनी व्यक्त केली होती. मात्र; अती श्रमाने दमलेल्या पोलीसांनी थेट या महिला आणि नागरिकांवर लाठीचार्ज केली होती. त्यामुळे न्यायासाठी रस्त्यावर येणे ही सुद्धा चूक आहे का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.



बुवाबाजीचे भूत मानगुटीवर

- गेल्या काही वर्षांच्या कालावधीत पुरोगामी महाराष्ट्रात बुवाबाजी फोफावू नये यासाठी अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि संघटनांनी जोरदार प्रयत्न केले; परंतु त्यांना समाजाचा रोष पत्करावा लागला. विशेष म्हणजे अनेकांना त्यांच्या प्राणाचीही आहुती द्यावी लागली; काही महिन्यांपूर्वी तर दिवगंत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही काही मानसिक विकृतीच्या नराधमांनी थेट 'काळी जादू' करण्याचा प्रकार उघडकीस आला होता. त्यामुळे पुरोगामी आणि संताच्या भूमीतील नागरिकांना अक्षरश: खाली मान घालायची दुर्दैवी वेळ आली आहे.

संपादकीय

सिंहस्थाच्या वाटेवरील हिरवाई भुईसपाट!



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



तपोवन परिसरातील वृक्षतोड, फाळके स्मारक पुनरुज्जीवनाच्या नावाने प्रस्तावित वृक्षसंहार, कुसुमाग्रज उद्यानातील वृक्षतोड, बारा बंगला जलशुद्धीकरण केंद्र परिसरातील तोड, तिडके कॉलनीतील झाडांची कत्तल आणि शहरातील प्रमुख रस्त्यांलगतचे विशालकाय वृक्ष छाटून टाकण्याचे प्रकार या सर्व घटनांनी नाशिकच्या पर्यावरणीय भवितव्याबद्दल गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. तपोवन परिसरात साधुग्राममध्ये जो प्रकार सुरू आहे, तो उभ्या महाराष्ट्राने पाहिलाच आहे. याच तपोवनात, जो नाशिकचा हरित आणि आध्यात्मिक श्वास मानला जातो, तेथे सांडपाणी प्रक्रिया केंद्रासाठी तब्बल 300 झाडे यापूर्वीच तोडण्यात आली. तिडके कॉलनी परिसरात 114 झाडांपैकी सुमारे 40 झाडे तोडण्यात आली. विविध विकासकामांच्या नावाखाली शहरभर वृक्षतोड सुरू आहे. या वृक्षतोडीच्या विरोधात पर्यावरणप्रेमी उभे ठाकल्याने वेळोवेळी न्यायालयीन हस्तक्षेप झाला, काही ठिकाणी स्थगिती मिळाली, पण विकासासाठी आपण किती मोठी पर्यावरणीय किंमत मोजणार आहोत, हा प्रश्न कायम राहिला. आज प्रशासन रस्त्यात येणाऱ्या झाडांना अपघातांचे कारण ठरवत आहे. ही झाडे अचानक टुणकन उडी मारून रस्त्यात आली का? खरे तर झाडे रस्त्यात आली नाहीत, तर रस्ते झाडांपर्यंत वाढवले गेले आहेत. नियोजनातील त्रुटींमुळे झाडे अडथळा ठरली. अनेक प्रगत देशांमध्ये पुरातन वृक्ष वाचवण्यासाठी रस्त्यांचे डिझाइन बदलले जाते, रस्ते वळवले जातात, संरक्षक कुंपण उभारले जाते. या देशांमध्ये रस्त्यांच्या विकासासाठी झाडे तोडणे हा पहिला नव्हे, तर अत्यंत शेवटचा पर्याय मानला जातो. ते झाडांना पर्यावरणीय संपत्ती, हवामान नियंत्रणाचे साधन आणि शहरी जीवनमानाचा महत्त्वाचा भाग समजतात. नेदरलँड्समध्ये रस्ते झाडांच्या अस्तित्वानुसार डिझाइन केले जातात, रस्त्यांना वळण देणे, झाडाभोवती संरक्षित आयलंड तयार करणे, वाहनांचा वेग नियंत्रित ठेवणे आणि सायकल तसेच पादचारी मार्ग स्वतंत्र ठेवणे अशा उपायांमुळे झाडे सुरक्षित राहतात आणि वाहतूकही सुरळीत चालते. जर्मनीमध्ये ऐतिहासिक वृक्षरांगा जपण्यासाठी रस्त्यांचे लेन बदलणे, झाडांभोवती क्रॅश बॅरियर बसवणे, वैज्ञानिक पद्धतीने मोठ्या झाडांचे स्थलांतर करणे आणि डिजिटल सेन्सरद्वारे त्यांच्या आरोग्यावर लक्ष ठेवणे यावर भर दिला जातो. जपानमध्ये मर्यादित शहरी जागेच्या परिस्थितीतही झाडे वाचवण्यासाठी उड्डाणपूल, भूमिगत रस्ते, अचूक वाहतूक शिस्त आणि झाडांच्या मुळांचे संरक्षण करणारे तंत्रज्ञान वापरले जाते. सिंगापूरने 'गार्डन सिटी' संकल्पनेअंतर्गत प्रत्येक विकास प्रकल्पापूर्वी सविस्तर वृक्ष सर्वेक्षण, प्रौढ झाडांचे ट्रान्सप्लांटेशन, संरक्षित हरित पट्टे आणि बाधित झाडांच्या तुलनेत अनेक पटींनी पुनर्लागवड ही धोरणात्मक प्रणाली विकसित केली आहे. ऑस्ट्रेलियामध्ये झाडांच्या मुळांसाठी विशेष रूट बॅरियर, लवचिक फूटपाथ आणि वाहतूक वेग मर्यादा वापरून झाडे व वाहनचालक दोघांचे संरक्षण केले जाते. अमेरिकेत हाय स्पीड रस्त्यांवर 'क्लिअर झोन' पद्धती वापरली जाते, तर निवासी भागात झाडे कायम ठेवून वाहतुकीचे नियंत्रण, गाडीरल आणि सार्वजनिक वाहतूक प्रोत्साहन दिले जाते. पोलंडमध्ये जुने वृक्षमार्ग संवर्धित ठेवण्यासाठी नवीन रस्त्यांची दिशा बदलणे, झाडे थेट धोकादायक क्षेत्रापासून दूर ठेवणे आणि कठोर पर्यावरणीय कायदे राबवले जातात. नाशिकसारख्या वेगाने वाढणाऱ्या शहरांमध्ये अशी धोरणे स्वीकारल्यास विकास आणि पर्यावरण यांच्यातील संघर्ष मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. डेरेदार वृक्ष हे कोणत्याही रस्त्याच्या कडेला उभे असलेले जैविक अस्तित्व, त्या मागार्चे सौंदर्य, संस्कृती, श्वास आणि पर्यावरणीय समतोल यांचे सजीव प्रतीक असतात. त्यांच्या विशाल फांद्या सावली देतातच, पण प्रखर उन्हाच्या झळांपासून शहराचे रक्षण करतात, तापमान नियंत्रित ठेवतात, वायुप्रदूषण कमी करतात आणि नागरी जीवनाला नैसर्गिक शीतलता प्रदान करतात. अशा वृक्षांना विकासाच्या मागार्तील अडथळा समजणे ही बाब दूरदृष्टी हरपल्याचे लक्षण आहे. वटवृक्षासारख्या एका भव्य, विस्तीर्ण आणि जीवनदायी वृक्षाला आपल्या पूर्ण डेरेदार रूपात यायला साधारण शतकभराचा कालावधी लागतो. वड, पिंपळ, उंबर यांसारखी वृक्षसंपदा ही काळाच्या प्रदीर्घ प्रवासातून आकाराला आलेली असते. अनेक पिढ्यांच्या साक्षीने, ऋतूंच्या चक्रातून, पावसाळ्यांच्या स्पशार्तून आणि निसर्गाच्या सहनशीलतेतून ही झाडे उभी राहतात. त्यामुळे अशी झाडे एका क्षणात तोडणे म्हणजे शंभर वर्षांहून अधिक काळ निसर्गाने घडवलेल्या जीवनसंपदेचा निर्दयी संहार करणे होय. थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या नाशिकने यंदा 42 अंश सेल्सिअसपर्यंत तापमान अनुभवले. याला केवळ ऋतूमानातील सामान्य चढउतार म्हणता येणार नाही. पर्यावरणीय असंतुलनाचे हे स्पष्ट संकेत आहेत. काँक्रीटीकरण, वाढती वृक्षतोड, घटती जैवविविधता आणि हवामान बदल यांचा हा थेट परिणाम आहे. 'अल निनो'सारख्या जागतिक हवामान घटनांमुळे पर्जन्यमान कमी होण्याची, उष्णतेच्या लाटा तीव्र होण्याची शक्यता वाढत असताना शहरातील हरितावरणाचे संरक्षण अधिकच आवश्यक बनते. झाडे ऑक्सिजन देतातच, शिवाय ती तापमान कमी करतात, कार्बन शोषतात, भूजल पुनर्भरण करतात, आर्द्रता टिकवतात आणि शहरी उष्णतेविरुद्ध नैसर्गिक कवच म्हणून कार्य करतात. एका प्रौढ वृक्षामुळे परिसरातील तापमानात 2 ते 5 अंशांनी घट होऊ शकते, हे अनेक संशोधनांनी सिद्ध केले आहे. पण प्रशासनाला या संशोधनांशी काहीएक देणे-घेणे नाही. महापालिका प्रशासन वृक्षतोडीच्या बदल्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवडीची आश्वासने देते. पण नाशिककरांचा गत अनुभव कटू आहे. जून ते सप्टेंबर 2025 या कालावधीत झालेल्या वृक्षतोडीच्या बदल्यात 17 हजार झाडे लावण्याचे आश्वासन देण्यात आले होते. प्रत्यक्षात या लागवडीचे कुठलेही ठोस पुरावे नाहीत. कॉलेज रोडवरील 146 झाडांच्या बदल्यात सातपूर भागात हजारो झाडे लावल्याचा दावा करण्यात आला, तपोवनातील 300 झाडांच्या बदल्यात फाशीच्या डोंगरावर पुनर्लागवड केल्याचे सांगण्यात आले, पण ही झाडे प्रत्यक्षात कुठे आहेत? त्यांचे अस्तित्व काय? त्यांची निगा कशी राखली जाते? यापूर्वी उड्डाणपूल प्रकल्पांमध्ये पुनर्रोपण केलेली अनेक झाडे पाण्याअभावी किंवा दुर्लक्षामुळे जळून गेली. त्यामुळेच वृक्षप्रेमींचा प्रशासनावरील विश्वास आता अक्षरशः ढासळला आहे. नाशिकमध्ये उड्डाणपूल, रस्ते रुंदीकरण आणि कुंभसंबंधित विकासकामांसाठी झाडांचे पुनर्रोपण हा पर्यावरणीय तोल राखण्याचा उपाय म्हणून मांडला गेला, मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या पुनर्लागवडीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. अनेक पुनर्लागवड केलेली झाडे पुरेशा पाण्याअभावी, देखभालीच्या अभावामुळे किंवा निष्काळजीपणामुळे सुकली, तर काही झाडांच्या परिसरात आग लागल्याच्या घटनांनी प्रशासनाची उदासीनता उघड झाली. पुनर्रोपण म्हणजे केवळ झाड हलवणे नसून त्यासाठी मुळांचे संरक्षण, योग्य माती, सातत्यपूर्ण सिंचन, हवामानाशी सुसंगत जागा आणि किमान काही वर्षे वैज्ञानिक देखभाल आवश्यक असते, परंतु अनेकदा हे केवळ कागदोपत्रीच राहते. शहरातील झाडे जगली तरच शहराचा श्वास जिवंत राहील, याची जाणीव सजग नागरिकांना प्रशासनापेक्षा कितीतरी अधिक तीव्रतेने आहे. तरीही वृक्षसंवर्धनासाठी उभे ठाकलेल्या या पर्यावरणप्रेमींना अनेकदा जणू काही व्यवस्था-विरोधी अतिरेकी असल्याप्रमाणे वागणूक दिली जाते. त्यांच्या प्रश्नांकडे शत्रुत्वाने पाहिले जाते, त्यांच्या आंदोलनांमध्ये अडथळे आणले जातात, त्यांच्यावर दबाव टाकला जातो, कायदेशीर गुंतागुंत निर्माण केली जाते आणि मानसिक त्रास देण्याचेही प्रयत्न होतात. परंतु या सर्व दडपशाहीसमोर न झुकता हे हरित योद्धे रस्त्यावर उतरतात, न्यायालयाचे दरवाजे ठोठावतात, हरित लवादापुढे आवाज बुलंद करतात आणि शहराच्या उरलेल्या श्वासासाठी अहोरात्र लढा देतात. त्यांचा संघर्ष हा भविष्यातील पिढ्यांच्या श्वासासाठी असतो, तो सावलीसाठी, पाण्यासाठी, जैवविविधतेसाठी आणि नागरी अस्तित्वाच्या संरक्षणासाठी असतो. जसा स्वातंत्र्यलढ्यातील सेनानींनी परकीय सत्तेविरुद्ध आपल्या मातृभूमीच्या स्वाभिमानासाठी संघर्ष केला, तसाच हा आधुनिक पर्यावरणलढा विनाशकारी आणि अल्पदृष्टी विकासाच्या मॉडेलविरुद्ध उभा आहे. हे कार्यकर्ते आजच्या युगातील खरे पर्यावरण सैनिक आहेत, जे स्वतःसाठी नव्हे, तर संपूर्ण शहराच्या जिवंत भविष्याकरिता हिरवाईच्या प्रत्येक पानासाठी लढत आहेत. खरे तर, विकासाला पर्यावरणप्रेमींचाही विरोध असण्याचे कारणच नाही. सिंहस्थ, रस्ते, नागरी सुविधा, धार्मिक आयोजन या सर्व गोष्टी महत्त्वाच्या आहेतच, परंतु त्या जर वृक्षांचा बळी घेऊन उभ्या राहत असतील, तर तो विकास नव्हे तर विनाश आहे, हे समजून घ्यावे. शिवाय, अध्यात्म, साधुसंत परंपरा आणि पर्यावरण यांचा परस्परविरोध कधीच राहिलेला नाही. साधूंची परंपरा ही निसगार्शी एकरूप होण्याची आहे, वृक्षसंहाराची नव्हे. तपोवनासारख्या ग्रीन झोनमध्ये झाडे राखूनही कुंभमेळ्याची तयारी होऊ शकते. रस्त्यात झाडे ठेऊनही रुंदीकरण होऊ शकते. झाडे जशीच्या तशी ठेऊन प्रकल्प उभे केले जाऊ शकतात. पण प्रशासनाला ही बाब कोण सांगेल? अशा निर्ढावलेल्या प्रशासनासमोर प्रत्येक नागरिकाने वृक्षसंवर्धन हे आपले कर्तव्य मानले पाहिजे. किमान एक तरी झाड लावणे, त्याचे संगोपन करणे, स्थानिक पर्यावरण चळवळींना पाठिंबा देणे आणि बेकायदेशीर वृक्षतोडीविरोधात आवाज उठवणे ही काळाची गरज आहे. हिरवाई वाचली तरच नाशिकचे आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय वैभव जिवंत राहील, अन्यथा विकासाच्या नावाखाली आपण आपल्या पुढील पिढ्यांसाठी उष्ण, कोरडे आणि निर्जीव शहर उभे करू.

मराठी बोलायची कोणी?

अभिजात भाषेचा मान मिळवूनही आज मराठी आपल्याच घरात पोरकी होतेय की काय, अशी भीती वाटू लागली आहे. रिक्षा-टॅक्सीचालकांनी मराठी बोललं पाहिजे ही मागणी कायदेशीररीत्या योग्यच आहे, पण जेव्हा दोन मराठी माणसं एकमेकांशी हिंदीत संवाद सुरू करतात, तेव्हा त्या मागणीतील धार कमी होते. राज्यातील रिक्षा आणि टॅक्सीचालकांसाठी एक मेपासून केलेला मराठी सक्तीचा निर्णय सध्या मत-मतांतरांनी गाजतो आहे. या निर्णयाला कायदेशीर आधार असल्याने त्याला थेट विरोध करणं कोणालाही अडचणीचंच आहे. त्यामुळे, वेगवेगळी खुस्पटं काढून त्यात खोडा घालण्याचा प्रयत्न सुरू आहे. राजकीय पक्षांमध्ये या निर्णयाला विरोध शिवसेनेतूनच झाला आहे. शिवसेनेतील अमराठी, उत्तर भारतीय नेते संजय निरुपम यांना प्रकाशझोतात येण्यासाठी हे चांगलं निमित्त मिळालं. यात दोन गंमती आहेत. मूळ निर्णय परिवहन विभागाचा आहे. त्याचे मंत्री प्रताप सरनाईक हे शिवसेनेचे नेते आहेत. त्यांच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी उभे राहिलेले पहिले नेते निरुपमही त्याच पक्षाचे आहेत! निरुपम मूळ पत्रकार. ते मुंबईत राजकीय क्षितिजावर उगवले ते पूर्वीच्या, म्हणजे मूळ शिवसेनेतून. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असतानाच. दोन वेळा खासदारकी झाल्यानंतर ते काँग्रेसवासी झाले. तिथून पुन्हा विभाजित शिवसेनेच्या, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात सामील झाले. सरनाईक यांच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी त्यांनी काल दहिसर गाठलं. तिथे त्यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सैनिकांशी गाठ पडली. त्यातून जो गोंधळ व्हायचा, तो झाला. रिक्षा-टॅक्सीचालकांसाठी मराठीसक्तीचा मुद्दा त्यामुळे वादाचा झाला. मनसेने आता साहजिकच त्यात पुढाकार घेतला आहे. 'महाराष्ट्रात मराठीचं भवितव्य' हा चिंतेचा विषय आजचा नाही. दशकानुदशके या विषयावर चर्वितचरण सुरू आहे. मराठीची पीछेहाटही अव्याहत सुरू आहे!! दरम्यानच्या काळात मोठा जोर लाऊन, राजकीय परिस्थितीचा फायदा उठवून महाराष्ट्राने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवला. हा दर्जा देणं केंद्राचं काम होतं. महाराष्ट्राच्या सरकारने ते केंद्राला करायला लावलं. पण, हा दर्जा मिळाल्यानंतर मराठीसाठी काही भरीव करायला हवं होतं ना? दोन-चार संशोधन प्रकल्प तरी सुरू व्हायला हवे होते. निदान मुंबईतल्या 'मराठी भाषा भावना'चं काय? हा प्रश्न विचारायला हवा होता. ते कोणी केलं का? आपली भाषा दुसऱ्याच्या माथी मारून त्यातून मातृभाषेचा विकास होईल, हा समज खरोखरच अजब आहे! भाषावार प्रांतरचनेच्या मूळ उद्देशाला धरून प्रत्येक प्रांतात तिथल्या राज्य भाषेचा वापर आणि विकास झाला पाहिजे, यात कोणाचंच दुमत नाही. कोणी याला विरोध करत असेल, तर त्याला तिथल्या तिथे या देशाच्या रचनेची जाणीव करून दिली पाहिजे. पण, आपली राज्यभाषा, आपली मातृभाषा जपण्याची, तिची प्रतिष्ठा वाढवण्याची, तिच्यात वेळोवेळी भर घालण्याची जबाबदारी त्या त्या भाषिक समूहांची असते. महाराष्ट्रात ही जबाबदारी मराठी भाषकांची आहे. त्यांनी व्यवहारात मराठी वापरली, तरच अन्य भाषकही आपसूक मराठी वापरतील. मराठी वापराची ही सुरुवात मराठी माणसानेच करायला हवी. ती त्याची जबाबदारी आहे. परप्रांतीय, अमराठी भाषकांची नाही. मुंबई ही साऱ्या देशाचं पोट भरणारी नगरी असल्याने इथे संपूर्ण देशातून लोक येत राहतात. वर्षानुवर्षं हे सुरू आहे. त्यामुळे, अन्य प्रांतातून मुंबईत येऊन स्थायिक झालेल्यांच्याही आता तीन - चार पिढ्या इथे नांदल्या आहेत. कायदेशीर भाषेत तेही 'महाराष्ट्रीय'च आहेत. तरीही अशा कुटुंबातल्या अनेकांना व्यवहारापुरतीही नीट मराठी येत नाही, हा दोष कुणाचा? त्यात त्यांचा वाटा तर आहेच; पण त्याहीपेक्षा अधिक त्यांना मराठी बोलणं, मराठी भाषेतून व्यवहार करणं अपरिहार्य न करणाऱ्या इथल्या स्थानिकांचा; म्हणजे मराठी माणसांचा आहे. बॉलिवूडचं केंद्र मुंबई असल्याने म्हणा, देशाची आर्थिक राजधानी ठरल्याने म्हणा, मराठी आणि हिंदीची लिपी एक असल्याने म्हणा, मराठी माणसाच्या न्यूनगंड म्हणा, की अतिभिडस्त स्वभाव म्हणा; पण मराठी माणूस मुंबईत सार्वजनिक ठिकाणी आपोआप हिंदी भाषेत शिरतो, हे ढळढळीत सत्य आहे. लोकल ट्रेनमध्ये सर्व अन्य भाषक आपल्या स्नेह्यांशी फोनवर किंवा अगदी आपसातही तारस्वरात मातृभाषेत बोलतात. सर्रास दिसणाऱ्या या दृश्यात मराठी माणूस तसा बोलताना कधी दिसतो का? दोन अनोळखी मराठी माणसंही आपला संवाद बहुतेकदा हिंदी किंवा इंग्रजीतूनच सुरू करतात. हा दोष कुणाचा? सेमी इंग्लिशचा पुरस्कार करूनही मराठी पालक आपल्या मुलांना शुद्ध इंग्रजी शाळेत घालण्यासाठी जीवाचा आटापिटा करतात. का? कारण, त्यांच्या नेत्यांची, साहित्यिकांची, अभिजात वर्गातली मुलं त्याच शाळेत शिकतात. मराठीतली नवी पिढी मराठीपासून अशी तुटली आहे, हे खरं ना? सामान्य मराठी माणसाने मराठी सण-उत्सव जिवंत ठेवण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली आहे. आता मराठी भाषा जगवण्याची जबाबदारीही त्यानेच घ्यायला हवी का? ते होत नाही, म्हणून भाषा जगवण्यासाठी तिचा असा विस्तार करायचा आहे का? मुळात वाहनचालक ज्या राज्यात परवाना घेत असेल, त्या राज्याची भाषा किमान स्वरूपात त्याला यायलाच हवी, असा नियम आहे. महाराष्ट्रात २०११ मध्येच त्याचा अंतर्भाव झाला आहे. त्याची कडक, अनिवार्य अंमलबजावणी व्हावी यासाठी सरकारने आता भूमिका घेतली आहे आणि ती योग्यच आहे. मध्य मुंबईतले अमराठी दुकानदार चांगली मराठी बोलतात. कारण, ती त्यांची व्यावसायिक गरज आहे. सर्व मराठीबहुल भागात हा अनुभव येईल. मुंबईने मराठी बोलावं असं वाटत असेल, तर मुंबईच्या वातावरणात मराठी पाहिजे. कानावर सतत मराठी पडली पाहिजे. परप्रांतीय टॅक्सी आणि रिक्षाचालक इथे निव्वळ पोट भरायला आले आहेत. मराठीचा दुःस्वास करायला नाही. पोट भरण्यासाठी, व्यवसायासाठी जे आवश्यक, ते ते करतीलच. मराठीही बोलतील. अट एकच आहे, मराठी माणसाने त्याच्याशी मराठीत बोललं पाहिजे. दुसऱ्यावर सक्ती करण्यापूर्वी आपण आपल्यावरच ही सक्ती करायला हवी. तसं केलं तर, ना शासन निर्णयाची गरज भासेल, ना कुठल्या अटी - शर्तींची, ना आंदोलनाची!

नेमेचि येते टंचाई...

ग्रामीण-शहरी भागांतील पाणीटंचाईची कारणेही निरनिराळी आहेत. असंतुलित विकासामुळे शिक्षण व रोजगार संधींअभावी स्थलांतरामुळे शहरीकरण आणि औद्योगिकरणामुळे बहुसंख्य शहरांत पाणी पुरवणे, हे आव्हान ठरले आहे. पुण्यासारख्या शहराच्या डोक्याशी चार धरणे असूनही वाढत्या लोकसंख्येला ते पाणी पुरत नाही. एप्रिल महिना सरत नाही, तोच महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये पाणीटंचाईच्या झळा सुरू झाल्या आहेत. काही अपवाद वगळता ग्रामीण भागापासून ते विकसित शहरांपर्यंत कोणाचीही या टंचाईतून सुटका होण्याची शक्यता दिसत नाही. मुंबई-कोल्हापूरसारख्या शहरांमध्ये आत्ताच पाणीकपातीचा निर्णय घेण्यात आला आहे; तर मराठवाड्याच्या अनेक भागांमध्ये पाणीटंचाई पाचवीलाच पुजल्याने शेकडो टँकर सुरू झाले आहेत. राजधानी मुंबईच्या शेजारील ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि भिवंडीसारख्या शहरांमध्ये टंचाईचे चटके बसू लागले आहेत. पुण्यासारख्या शहरात अघोषित कपात सुरू झाली आहे, तर अनेक शहरांत आठवड्यातून एकदाच मिळणाऱ्या पाण्यातच जनता समाधान मानत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करणाऱ्या वाड्या-वस्त्यांमधील बायाबापड्यांच्या डोक्यावरील हंडा या जन्मात तरी उतरणार का, हा प्रश्न विचारण्यापलीकडे गेला आहे. त्यातच यंदा 'एल निनो'मुळे अपुरा पाऊस होणार असल्याचा अंदाज असून, पावसाचे आगमनही वेळेत होणार का, हे सांगता येत नाही. दमदार पाऊस होऊन जलस्रोत भरेपर्यंत, म्हणजे किमान दीड महिना तरी पाणीसाठा पुरवून वापरण्याशिवाय पर्याय नाही. गेल्या वर्षी ज्या मराठवाड्यात बंधारे फुटेपर्यंत पाऊस झाला, तेथे काही महिन्यांतच या टंचाईची सर्वाधिक भीषणता जाणवावी, यासारखा दैवदुर्विलास नाही. त्यासह राज्याच्या बहुसंख्य भागांत अतिवृष्टी झाल्यानंतरही पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ नागरिकांवर का यावी, हा प्रश्नच आहे. त्यासाठी केवळ निसर्गाच्या अवकृपेकडे बोट दाखवून चालणार नाही; नियोजन-व्यवस्थापनाचा अभाव आणि सरकारी अकार्यक्षमतेचे हे परिणाम आहेत. मुळातच महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण अपुरे आणि सिंचनावरही मयार्दा आहेत. 'पुणेकर दोनदा अंघोळ करतात,' अशी बालिश वक्तव्ये करून 'ग्रामीण विरुद्ध शहरी' असा वाद पेटवून किंवा वरवरच्या उपाययोजना मांडून मूळ प्रश्नांकडे केली जाणारी सोयीस्कर डोळेझाक कधी तरी थांबवली पाहिजे. पुण्यातील पाणीपुरवठा व्यवस्थेमध्ये तब्बल ४० टक्के गळती होते; त्यात वितरणातील त्रुटींबरोबरच पाणीचोरीचाही मोठा वाटा आहे. हे रोखण्यासाठी जलवाहिन्यांतून पाणी पुरवणे, जुन्या जलवाहिन्या बदलणे अशी कामे तातडीने हाती घेण्यास महापालिका किंवा राज्य सरकारचे हात कोणी बांधले आहेत? 'पुणे शहराला २४ तास पाणीपुरवठा करू,' अशी घोषणा करून दशकभराचा काळ लोटला; पण अजूनही योजनेच्या टाक्यांची कामे रखडलेली असून, उलटपक्षी आठवड्याला '२४ तास पाणीपुरवठा बंद' राहतो. पूर्वीच्या आश्वासनांचे कारभाऱ्यांना सोयरसुतकही नाही. लातूर, छत्रपती संभाजीनगर किंवा जालन्यासारख्या शहरांतही नागरिकांच्या पदरी फक्त आश्वासनेच आली आहेत. कमी पाऊसमान आणि सिंचनव्यवस्थेवरील मयार्दा लक्षात घेता, पाण्याची बचत आणि फेरवापरावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. उजनीसारखे शंभर अब्ज घनफूट (टीएमसी) क्षमतेचे धरण दर वर्षी रिकामे होते आणि त्याच महाकाय धरणाशेजारील सोलापूर शहराला आठवड्यातून एकदा पाणी मिळते, याची कोणालाही खंत वाटत नाही. सर्वाधिक पाणीवापर असलेल्या ऊसासाठी ठिबक-तुषार सिंचनाचा प्रसार करण्यात सरकारला अजूनही यश आलेले नाही आणि त्यासाठी पुरेसे प्रयत्नही होताना दिसत नाहीत. महाराष्ट्रात पाण्याचा फेरवापर करण्याचे प्रमाण अवघे चार टक्के आहे. नियोजन आणि अंमलबजावणीची कूर्मगती पाहता पाच वर्षांत ते प्रमाण ४० टक्क्यांवर नेण्याचे उद्दिष्ट साध्य होण्याची शक्यता दिसत नाही. हे तंत्रज्ञान आवाक्यात आणणे आणि प्रक्रियायुक्त पाणी वापरण्यास शेतकऱ्यांना राजी करण्याचे आव्हान आहे. कोट्यवधी रुपयांच्या खचार्नंतरही 'जलयुक्त शिवार' किंवा 'जलजीवन मिशन' सारख्या योजनांचे सर्वदूर परिणाम दिसलेले नाहीत. टंचाई-दुष्काळाची चाहूल लागल्यावरच सरकारला जाग येते आणि पाऊस झाल्यावर सर्व घोषणा हवेत विरतात. ही मानसिकता बदलली नाही, तर दुष्काळमुक्तीच्या घोषणा भाषणांपुरत्याच राहतील, यात प्रत्यवाय नसावा.

भाडोत्री बाबांचा बेछूट भंपकपणा!

मध्य प्रदेशातील बागेश्वर धामचे बागेश्वर बाबा म्हणजेच धीरेंद्र शास्त्री यांनी महाराष्ट्रात येऊन महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि प्रेरणास्थान छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल जे वादग्रस्त विधान केले आहे, त्यामुळे विशेषतः राज्यात सत्ताधारी असलेल्या भाजपची मोठी गोची झाली आहे. त्या मुद्द्यावरून भाजपला विरोधकांनी कोंडीत पकडले आहे. विषय शिवरायांचा असल्यामुळे भाजपलाही तोंड उघडणे मुष्कील झाले आहे. तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला आहे. कारण फडणवीस यांना बागेश्वर बाबांना दुखवून उत्तर भारतीयांना नाराज करायचे नाही. खरे तर मुख्यमंत्र्यांना बागेश्वर यांच्या अज्ञानाबद्दल चार खडे बोल त्यांना सुनावता आले असते, पण त्यांनी तसे केले नाही, पण हेच जर अन्य कुणी केले असते, तर ते त्यांनी गळ्याच्या शिरा ताणून छत्रपती शिवाजी महाराज कसे महान होते, हे सांगून त्यांचा महिमा गायला असता. पण बागेश्वर यांच्याबाबत ते फारसे काही बोलताना दिसत नाहीत. त्यात बागेश्वर यांनी बोलताना समर्थ रामदास यांना मोठेपण दिलेले आहे. त्यामुळे फडणवीस त्याविरोधात जास्त आक्रमक भूमिका घेणार नाहीत हे ओघाने आलेच. नागपूरच्या जामठा येथे असलेल्या नॅशनल कॅन्सर हॉस्पिटल परिसरात शुक्रवारी भारतदुर्गा मंदिराचे भूमिपूजन व कोनशिला अनावरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांचे उदाहरण देताना बागेश्वर म्हणाले होते की, एका मोहिमेनंतर शिवाजी महाराज थकले होते आणि ते समर्थ रामदास स्वामींकडे गेले. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपला मुकुट काढून समर्थ रामदास स्वामींच्या पायाशी ठेवत आपण थकलो असून आता राज्यकारभार आपण सांभाळावा, अशी विनंती केली होती. त्यावर रामदास स्वामींनी 'तू माझा शिष्य आहेस आणि मी तुझा गुरू' असे सांगत पुन्हा मुकुट छत्रपती शिवाजी महाराजांच्या मस्तकावर ठेवला आणि राज्यकारभार चालवण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. मुळात अशा ऐतिहासिक व्यक्तींबद्दल बोलताना बागेश्वर यांच्याकडे तसे काही पुरावे आहेत का, हा एक प्रश्न आहे. ही व्यक्तिमत्वे होऊन गेलेली आहेत. हे काही दंतकथेतील नायक नाहीत. त्यामुळे त्यांच्याविषयी भाष्य करताना ते जबाबदारीने करायला हवे. मुळात बागेश्वर यांच्यासारखी माणसे आध्यात्मिक प्रवचने सांगत असतात. बागेश्वर हे लोकांच्या मनात काही आहे ते जाणतात, ते लिहून देतात. अगदी त्यांच्या सांस्कृतिक मेळाव्यात कुणाची वस्तू चोरीला गेली तेही त्यांना कळते, ते नावासह सांगतात, असे मानले जाते. सोशल मीडियामुळे त्यांची सगळीकडे वेगाने प्रसिद्धी झालेली आहे. त्यांच्या चमत्कारामुळे तर ते अल्पावधीत आणि कमी वयात सर्वदूर पोहोचले आहेत. विशेषतः हिंदू धर्मियांवर त्यांचा मोठा प्रभाव आहे. त्यामुळेच ते भाजपला जास्त प्रिय आहेत. परिणामी अशा माणसाने वादग्रस्त वक्तव्य केले असले तरी त्याला लगेच दुखावता येत नाही. अर्थात, बागेश्वर यांच्या वक्तव्यानंतर महाराष्ट्रातून अनेकांकडून संताप व्यक्त करण्यात आला. त्यात काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे लोक जास्त ताकदीने उतरले. सातारा आणि कोल्हापूर येथील राजघराण्यातील मान्यवर बागेश्वर यांच्याविरोधात उतरले. त्यांनी बागेश्वरवरून भाजपला टार्गेट केले. अगोदरच महाराष्ट्रात एका भोंदू बाबामुळे भाजपचे वांदे झालेले आहेत. कारण मंत्रिमंडळातील बरेच आमदार आणि मंत्री त्या बाबाचे भक्त असल्याचे उघड झालेले आहे. त्यामुळे आधीच एका भोंदू बाबामुळे बेजार त्यात पुन्हा या बाबामुळे डोकेदुखी वाढली. त्यामुळे भाजपकडून त्याला काही सूचना गेल्या असाव्यात. त्यामुळे बागेश्वर यांनी आपल्या वक्तव्याबद्दल माफी मागितली. त्यांनी माफी मागितली हे योग्य झाले. पण अशा प्रकारचे वक्तव्य करण्याचे त्याचे प्रेरणास्थान कुठले आहे, याचा शोध घ्यायला हवा. कारण हे बागेश्वर बाबा स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवतात, तर मग त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास वाचला असेल तर त्यांना आपण काय बोलतोय याचे भान असायला हवे होते. महाराष्ट्रात येऊन जर ते उत्तर भारतामध्ये अजूनही भक्कम असलेले वर्णश्रेष्ठत्व रुजवू पहात असतील, तर ते कदापिही योग्य नाही. कारण महाराष्ट्र हा नेहमीच पुरोगामी राहिलेला आहे, त्यामुळे महाराष्ट्राकडून अन्य राज्यांनी सामाजिक सुधारणेचा कित्ता गिरवलेला आहे. त्यामुळे बाबा बागेश्वर यांनी असले उद्योग इथे करू नयेत.

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार, १२ मे २०२६ ते १८ मे २०२६

कधी कृष्णाचा अवतार, तर कधी शिवाचा...

महाराष्ट्रातील दोन शहरांत सर्वाधिक भोंदूबाबा अटकेत, तुमचं शहर यात आहे का?



मुंबई । महाराष्ट्र जादूटोणाविरोधी कायद्यांतर्गत गेल्या महिन्यात १४ भोंदू बाबांवर गुन्हे दाखल झाले असून मुंबई आणि नाशिकमध्ये सर्वाधिक कारवाया झाल्या आहेत. सुशिक्षित नागरिकांची फसवणूक आणि महिलांच्या शोषणाचे धक्कादायक प्रकार समोर येत आहेत. राज्यभरात गाजलेल्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणानंतर अंधश्रद्धेच्या नावाखाली सर्वसामान्यांची लूट करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी आणि सामाजिक संस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. गेल्या ३० दिवसांत राज्याच्या विविध जिल्ह्यांतून भोंदू बाबांबद्दल धक्कादायक माहिती समोर येताना दिसत आहे. यानुसार, गेल्या महिनाभरात १४ भोंदू बाबांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये शहरी भागातील सुशिक्षित नागरिकांची होणारी फसवणूक चिंतेचा विषय ठरत आहे.

नाशिक आणि मुंबईत सर्वाधिक कारवाई

मिळालेल्या माहितीनुसार, राज्यात गेल्या एका महिन्यात १४ भोंदू बाबांविरोधात तक्रार नोंदवण्यात आली आहे. या नोंदवण्यात आलेल्या एकूण गुन्ह्यांपैकी सर्वाधिक गुन्हे हे मुंबईतील आहे. मुंबईतून ४ भोंदूबाबांविरुद्ध तक्रार करण्यात आली आहे. तर नाशिकमध्ये ३ भोंदू बाबांविरुद्ध गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. तर उर्वरित गुन्हे राज्याच्या विविध जिल्ह्यांत विभागलेले आहेत. आतापर्यंत असा समज होता की भोंदूगिरी केवळ ग्रामीण भागात चालते, परंतु या ताज्या आकडेवारीवरून मुंबई आणि नाशिकसारख्या महानगरांमध्येही बुवाबाजी मोठ्या प्रमाणावर फोफावल्याचे सिद्ध झाले आहे. तसेच अशोक खरात प्रकरणानंतर पीडित नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये जनजागृती झाली आहे. यामुळेच अनेक वर्षांपासून सुरू असलेले हे प्रकार आता पोलिसांपर्यंत पोहोचत आहेत. खटला भरताना प्रामुख्याने महाराष्ट्र जादूटोणाविरोधी कायदा २०१३ अंतर्गत कारवाई केली जात आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीने (अंनिस) या मोहिमेत पुढाकार घेतला आहे. भोंदूगिरी नष्ट करण्यासाठी केवळ कायदेशीर कारवाई पुरेशी नाही, तर लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे आवश्यक आहे. अंनिसच्या वतीने राज्यात ठिकठिकाणी अशा भोंदू बाबांचा शोध सुरू असून, पुढील काळात ही मोहीम अधिक तीव्र केली जाईल, असे समितीचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी स्पष्ट केले.

अवताराच्या नावाखाली महिलांचे शोषण

या प्रकरणांमध्ये समोर आलेली गुन्ह्यांची पद्धत अत्यंत भयावह आहे. आरोपींनी स्वत:ला कृष्णाचा अवतार किंवा शिवाचा अवतार सांगत महिलांना आपल्या जाळ्यात ओढले. कौटुंबिक अडचणी, आजारपण किंवा मानसिक त्रासावर उपाय करण्याच्या बहाण्याने या महिलांचे आर्थिक आणि शारीरिक शोषण करण्यात आले. अध्यात्माचा आधार घेऊन महिलांवर अत्याचार करणाऱ्या या भोंदू बाबांच्या टोळ्या आता पोलिसांच्या रडारवर आहेत.



रात्री 12 च्या ठोक्याला अंगात येतं अन् दुसऱ्या दिवशी सकाळी...

राज्यात आणखी एका भोंदूबाबाचा खेळ उजेडात

एकीकडे महाराष्ट्र विज्ञानवादी आणि पुरोगामी विचारांचा वारसा सांगत असताना आता दुसरीकडे अकोला जिल्ह्यातील मुर्तीजापुर तालुक्यात काळजाचा ठोका चुकवणारी घटना समोर आली आहे. मुर्तीजापूर तालुक्यातील पोही गावात एका भोंदू बाबाने दैवी शक्तीचा दावा करत अंधश्रद्धेचे दुकान थाटले आहे. त्यामुळे शेकडो भाविक या जाळ्यात अडकल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

नेमका प्रकार काय?

पोही गावातील रामभाऊ नामदेव भड नावाचा व्यक्ती स्वत:ला चंदनशेष किंवा चंदनमुरारी बाबा म्हणवून घेतो. या बाबाचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. ज्यामध्ये तो दर सोमवारी आणि प्रत्येक पौर्णिमेला आपल्या अंगात सवारी येत असल्याचा बनाव रचताना पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे हा प्रकार दिवसाढवळ्या न घडता रात्रीच्या गूढ अंधारात पार पडतो. रात्री १ वाजल्यापासून पहाटेपर्यंत भजनाच्या गजरात हा अंधश्रद्धेचा दरबार रंगतो.

भक्तांच्या श्रद्धेशी खेळ आणि वसुली

या दरबारात बाबाकडून अघोरी कृत्ये केली जात असल्याचा आरोप आहे. यामध्ये प्रामुख्याने अनेक अघोरी उपचार केले जातात. यात भक्तांवर लिंबू पिळणे, अंगारे-धुपारे देणे आणि गंडा-दोरे बांधून आजार बरे करण्याचा दावा करणे, असे प्रकार घडतात. विशेष म्हणजे अपत्यप्राप्तीचे आमिष दाखवून हतबल महिलांची फसवणूक करणे. तुला मुलगा होईल, पण त्या बदल्यात तू मला काय देशील? अशा शब्दांत बाबा भक्तांशी संवाद साधत असल्याचे पाहायला मिळत आहे. ही घटना व्हिडीओत कैद झाली आहे. विशेष म्हणजे हा सर्व प्रकार विनामूल्य नसून, दरबारात येणाऱ्या प्रत्येक भक्ताकडून पैसे उकळले जातात. चक्क ५० रुपयांची अधिकृत पावती फाडली जाते. या बाबाच्या कृत्यामुळे गावातील सुशिक्षित तरुण आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. यापूर्वीही या बाबाविरोधात तक्रारी झाल्या होत्या. मात्र काही काळ शांत राहिल्यानंतर पुन्हा हा प्रकार सुरु झाला. अखेर, हा अंधश्रद्धेचा बाजार कायमचा बंद व्हावा यासाठी गावकऱ्यांनी अकोला पोलीस अधीक्षकांकडे धाव घेऊन लेखी निवेदन दिले आहे. या भोंदू बाबावर जादू टोणा विरोधी कायद्यांतर्गत तात्काळ गुन्हे दाखल करून त्याला बेड्या ठोकण्यात याव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

मैत्री, शीरखूर्मा आणि नशीले औषधं...

टीसीएस लैंगिक अत्याचाराप्रकरणात सर्वात धक्कादायक खुलासा

नाशिक। टीसीएस कंपनीतील एका विशिष्ट धार्मिक गटाकडून महिलांचे लैंगिक शोषण आणि धर्मांतरणाच्या प्रकरणाने देश हादरला. टीसीएस सारख्या बहुराष्ट्रीय मानांकित कंपनीतील याप्रकाराविरोधात हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या. प्रकरणातील एक फरार आरोपी निदा खान ही अजूनही यंत्रणांना गुंगारा देत आहे. तिचा अटकपूर्व जामीन फेटाळून न्यायालयाने दणका दिला. याप्रकरणातील चार आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनाववली. या प्रकरणातील आरोपींचे दिल्ली बॉम्बस्फोटातील दहशतवाद्यांशी कनेक्शन असल्याचे समोर येत असतानाच अजून एक धक्कादायक खुलासा समोर आला आहे.

याप्रकरणातील चार आरोपींना आरोपींना 5 मे पर्यंत पोलीस कोठडी



देण्यात आली आहे. या कोठडीत मांसाहारासह गुंगीकारक आणि मादक पदार्थ सेवन करण्यासाठी दिल्याचा पोलीस तपास करणार आहेत. या कोठडीत आरोपी काय कबुलीजबाब देतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आरोपी कंपनीच्या कॅन्टीनमध्ये हिंदू देवी-देवतांबद्दल आक्षेपार्हय वक्तव्य करत असत. तर कंपनीच्या ग्रुपवर अश्लिल शेरेबाजी करत असल्याचे चॅटिंगमधून समोर आले आहे. इतकेच नाही तर कंपनीकडून विशेष धार्मिक सूट मिळाल्याचा गैरफायदाही त्यांनी घेतल्याचे धर्मांतरणाच्या प्रयत्नातून समोर आले आहे.

नाशिक येथील टीसीएस प्रकरणात पीडितांना गुंगीकरकर औषध दिल्याचा दाट संशय यंत्रणांना आहे. त्या अनुषंगाने तपास सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, शीरखुर्मासारख्या गोड पदार्थातून या पीडितांना आरोपींनी नशेचा पदार्थ दिल्याचा संशय व्यक्त होत आहे. मैत्री झाल्यानंतर या महिलांना शीरखूर्मा देण्यात आला. त्यात नशेचे पदार्थ असल्याचा दावा करण्यात येत आहे. या खुलाशाने आता खळबळ उडाली आहे. लैंगिक शोषण करण्यासाठी पीडितांना नशेचा पदार्थ दिला जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. लैंगिक शोषण करण्यासाठी पीडित महिलांना कामूक करण्यासाठी या पद्धतीचा वापर केला जात होता. पीडित महिलांना मादक पदार्थ खाऊ घालतं लैंगिक अत्याचार केल्याचा संशय आहे. नाशिक पोलीस आता या अँगलने तपास करत आहेत.

आरोपी निदा खान हीला मोठा झटका, कोटार्ने फेटाळला अटकपूर्व जामीन

नाशिकच्या बहुचर्चित टीसीएस प्रकरणात नाशिक रोड न्यायालयाने आरोपी निदा खान हीचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला आहे. कोटार्ने दोन्ही बाजूंच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर हा निर्णय दिला आहे. सरकारी पक्षाने आरोप केला की पीडीतेला धार्मिक रितीरिवाजाकरीता प्रभावित केले गेले. तिचे नाव बदलले गेले आणि त्याची कागदपत्रे आरोपीकडे होती. या प्रकरणाच्या तपासासाठी आरोपी निदा खान हीचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला जाणे ही बाब महत्वाची म्हटली जात आहे. कोटार्ने दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर आपला निर्णय राखून ठेवला आणि आज हा निकाल सुनावला. या प्रकरणात सरकारी पक्षाच्या वतीने वकील अजय मिसर हे न्यायालयात हजर होते. तर आरोपींच्या वतीने वकील राहुल कासलीवाल यांनी युक्तीवाद केला. २९ एप्रिल रोजी या याचिकेवर बंद कक्षात सुनावणी झाली. त्यावेळी विशेष तपास पथकाच्या वतीने सहायक पोलिस आयुक्त संदीप मिटके यांनी तपास अधिकारी म्हणून आपली बाजू मांडत जामिनाला विरोध केला. या आधी १८ एप्रिल रोजी देखील आरोपीच्या अटकपूर्व जामीन अर्जावर सुनावणी झाली होती. ज्यात बचाव पक्षाने त्यांची बाजू सविस्तरपणे मांडली. त्यानंतर तपास पथकांनी सादर केलेल्या पुरावे आणि दस्ताएवजांवर न्यायालयाने गंभीरपणे विचार केला.

नाशिकच्या महिला शिक्षकेला सुरतमध्ये डीआरआय च्या अधिकाऱ्यांनी घेतलं ताब्यात

तब्बल 'एवढ्या' कोटींचे ड्रग्ज हस्तगत

मुंबई। महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) सुरतमध्ये मोठी कारवाई केली आहे. 'डीआरआय'ने दिल्लीतून मुंबईला येणाऱ्या एका महिलेला अटक केली आहे. संबंधित महिलेकडून तब्बल २५ कोटी रूपयांचे मेथॅम्फेटामाइन ड्रग्ज ताब्यात घेतले आहे. ही महिला शिकवणी चालक म्हणून काम करत असे. पण, ती छुप्या पद्धतीने ड्रग्ज सप्लायचे काम करत होती. 'डीआरआय'च्या अधिकाऱ्यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार त्यांनी सुरत रेल्वे स्टेशनवर सापळा लावला होता. शुक्रवारी हरजत निजामुद्दीन ते दादर, ही रेल्वे प्लॅटफॉर्मवर आली. तेव्हा अधिकारी रेल्वेच्या बी ७ नंबरच्या डब्यात शिरले. तिथे आसन क्रमांक १२ वर बसलेल्या महिलेला अधिकाऱ्यांनी घेरलं. प्राथमिक तपासानंतर महिलेला ताब्यात घेण्यात आलं. तिथेच तिच्याकडे असलेल्या वस्तूंची तपासणी सुरू केली.

तपासादरम्यान महिलेजवळ असलेल्या ट्रॉली बॅगेत काळ्या चिकपट्टीनं बांधण्यात आलेले सात पॅकेट जप्त करण्यात आले. त्यासह बूट आणि शर्टचेही दोन बॉक्स मिळाले. ज्यात ड्रग्ज लपवण्यात आले होते. अधिकाऱ्यांनी पाठीवर



अडकवण्यात येणाऱ्या बॅगचीही तपासणी केली. यात संपूर्ण तपासात मेथॅम्फेटामाइन ड्रग्जचे एकूण ९ पॅकेट जप्त करण्यात आले.

अटक करण्यात आलेल्या महिलेचं नाव मल्लिका चिगरे (वय, ४५ रा. नाशिक) असे आहे. अटकेनंतर महिलेला सुरतच्या जिल्हा न्यायालयात हजर करण्यात आले. तिला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेल्या ड्रग्जची आंतरराष्ट्रीय बाजारात किंमत तब्बल २५ कोटी रूपयांहून अधिक आहे. तपासात हेही समोर आले की, अटक करण्यात आलेल्या महिलेला दिल्लीतील हजरत निजामुद्दीन रेल्वे स्टेशनवर एका अज्ञात व्यक्तीने ड्रग्ज सप्लायसाठी दिले होते. हे ड्रग्ज मुंबईच्या पुढे पोहोचवण्यात येणार होते. याप्रकरणात आणखी कुणा-कुणाचा समावेश आहे, याचा 'डीआरआय'कडून तपास केला जात आहे.

विष, औषध की कटकारस्थान?

कुटुंबाचे मोबाईल फोन तपासणीच्या कक्षेत

मुंबई। काही दिवसांपूर्वीच पायधुनी परिसरात एकाच कुटुंबातील चार सदस्यांचा अचानक झालेला मृत्यू यामुळे संपूर्ण मुंबई शहर हादरून गेले आहे. सुरुवातीला, हे प्रकरण केवळ 'अन्नातून विषबाधेचे' असावे असे मानले जात होते. मात्र, जसजसा तपास पुढे सरकत आहे, तसतसे या प्रकरणाचे स्वरूप नाट्यमयरीत्या बदलताना दिसत आहे. हे प्रकरण आता केवळ एखादा साधा अपघात नसून, त्यामागे एखादे मोठे कटकारस्थान असावे, या दिशेने निर्देश करत आहे. मृत व्यक्तींच्या शवविच्छेदन दरम्यान डॉक्टरांना जे निष्कर्ष आढळले, त्यामुळे सर्वजण अवाक झाले आहेत. शवविच्छेदन अहवालानुसार, मृत व्यक्तींचे अंतर्गत अवयव नैसर्गिक किंवा सामान्य स्थितीत नव्हते, उलट ते विचित्ररित्या हिरव्या रंगाचे झाल्याचे आढळून आले. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारची घटना अत्यंत दुर्मिळ आणि असामान्य मानली जाते. शिवाय, कुटुंबातील एका सदस्याच्या शरीरात ह्यमॉर्फिनह्मचे अंश आढळून आले आहेत. मॉर्फिन हे एक अत्यंत प्रभावी वेदनाशामक आणि अंमली पदार्थ आहे. नेमक्या याच शोधामुळे हे संपूर्ण प्रकरण आता गूढतेच्या गर्तेत लोटले गेले आहे. त्यामुळे मॉर्फिन किंवा इतर एखादा विषारी पदार्थ त्यांच्या अन्नात आणि पेयात नेमके कसे मिसळला गेले? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. सदर घटना 25 एप्रिलच्या रात्री घडली. त्यावेळी घरात कुटुंबाचे एकूण नऊ सदस्य उपस्थित होते आणि रात्री साधारण 10.30 वाजता सर्वांनी एकत्र जेवण केले. त्यावेळी सर्व काही अगदी सामान्य वाटत होते. मात्र, पहाटे साधारण 1.30 वाजता कुटुंबातील चार सदस्यांनी पुन्हा एकदा



बियार्णी आणि कलिंगडाचे सेवन केले. नेमक्या याच टप्प्यावर परिस्थितीने अत्यंत गंभीर वळण घेतले. पहाटे 5 वाजण्याच्या सुमारास या चारही व्यक्तींची प्रकृती अचानक बिघडू लागली. त्यांना तीव्र उलट्या होऊ लागल्या, प्रचंड अशक्तपणा जाणवू लागला आणि त्यांचे शरीर पूर्णपणे निकामी झाले. त्यामुळे घाईगडबडीत सर्वांना रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु डॉक्टरांना त्यांना वाचवण्यात यश आले नाही. डॉक्टरांच्या निरीक्षणानुसार, अन्नातून होणाऱ्या साध्या विषबाधेच्या प्रकरणांमध्ये रुग्णाची प्रकृती खालावण्यासाठी आणि गंभीर होण्यासाठी साधारणपणे काही कालावधी लागतो. मात्र, या घटनेमध्ये चारही जणांचा ज्या वेगाने मृत्यू झाला आहे, तो वेग अत्यंत असामान्य मानला जात आहे. नेमक्या याच कारणामुळे, आता या प्रकरणाच्या तपासाची दिशा बदलली असून त्यामध्ये 'विषप्रयोग' किंवा एखाद्या 'रासायनिक पदार्थाचा वापर' केला गेला असावा, या शक्यतांवर अधिक लक्ष केंद्रित केले जात आहे. पोलीस आता या प्रकरणाचा सर्व संभाव्य बाजूने तपास करत आहे. या भीषण घटनेमागे कोणतीही वैयक्तिक शत्रुत्व, आर्थिक वाद किंवा अन्य कोणताही हेतू दडलेला आहे का? हे शोधून काढण्यासाठी कुटुंबाचे मोबाईल फोन तपासले जात आहेत, कॉल रेकॉर्ड्सची कसून छाननी केली जात आहे आणि बँक खात्यांचीही तपासणी केली जात आहे. या घटनेचे पडसाद आता बाजारातही उमटू लागले आहेत. या प्रकरणामध्ये बियार्णीसोबतच कलिंगडाचाही संबंध जोडला गेल्यामुळे, जनमानसात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आशियातील सर्वात मोठ्या घाऊक बाजारपेठांपैकी एक मानल्या जाणाऱ्या नवी मुंबईतील अढटउ बाजारपेठेत कलिंगडाच्या विक्रीत अचानक मोठी घट झाली आहे. उन्हाळ्याच्या हंगामात कलिंगडाला सहसा मोठी मागणी असते, मात्र आता लोकांनी कलिंगड खरेदी करण्यास संकोच वाटू लागला आहे. परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की, कलिंगडाचे घाऊक दर घसरून केवळ 5 ते 7 रुपये प्रति किलोपर्यंत खाली आले आहेत. यापूर्वी, याच कलिंगडांची घाऊक बाजारात 10 ते 35 रुपये प्रति किलो दराने विक्री होत असे, तर किरकोळ दुकानांमध्ये त्यांना 30 ते 100 रुपये प्रति किलोपर्यंतचा भाव मिळत असे. पण भीतीपोटी व्यापाऱ्यांना आता आपला साठा अत्यंत कमी दरात विकताना दिसत आहेत. दरम्यान, अन्न आणि औषध प्रशासनाने देखील आपला तपास अधिक तीव्र केला आहे. एका पथकाने संबंधित निवासस्थानाच्या स्वयंपाकघरातून बियार्णी, कलिंगड, पाणी, तांदूळ, चिकन, मसाले आणि खजूर यांसह एकूण 11 वेगवेगळ्या प्रकारच्या नमुन्यांचे संकलन केले आहे. प्राथमिक तपासात, जिवाणूंच्या संसर्गामुळे (बॅक्टेरियल कंटॅमिनेशन) अन्नातून विषबाधा झाल्याचे कोणतेही संकेत आढळले नाहीत. यामुळे, अन्नामध्ये जाणीवपूर्वक एखादा बाह्य पदार्थ मिसळला गेला असावा, या संशयाला अधिकच बळकटी मिळाली आहे.

ड्रग्ज विक्रीचे पैसे गर्लफ्रेंडच्या खात्यात! नेस्को प्रकरणी मुख्य आरोपी अटकेत

मुंबई। गोरेगावच्या नेस्को संकुलात आयोजित एका हाय-प्रोफाईल म्युझिक कॉन्सर्टमध्ये ड्रग्जच्या अतिसेवनामुळे दोन तरुण एमबीए विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता, या प्रकरणाने संपूर्ण राज्य हादरले होते. या प्रकरणाच्या तपासात मुंबई पोलिसांनी आतापर्यंतचा सर्वात मोठा आणि धक्कादायक खुलासा केला आहे. या आंतरराष्ट्रीय ड्रग्ज रॅकेटचा मुख्य सूत्रधार ड्रग्ज विक्रीतून मिळणारा काळा पैसा पांढरा करण्यासाठी आणि पोलिसांच्या नजरेतून वाचण्यासाठी एका अनोख्या शक्कलचा वापर करत होता. आपल्या प्रेयसीच्या नावावर असलेले बँक खाते आणि तिचा वैयक्तिक पेमेंट स्कॅनर वापरून तो ड्रग्जच्या पैशांची वसुली करत



मुख्य सूत्रधार विमानतळावरून गजाआड

या संपूर्ण रॅकेटचा मास्टरमाईंड महेश हिरो खेमलानी उर्फ मार्क (44) याला पोलिसांनी शुक्रवारी अटक केली. 11 एप्रिल रोजी नेस्कोमध्ये आयोजित '99999999 टेक्नो कॉन्सर्ट' दरम्यान ज्या दोन एमबीए विद्यार्थ्यांचा अतिसेवनामुळे मृत्यू झाला होता, त्यांना 'एक्स्टसी'च्या गोळ्या खेमलानीनेच पुरवल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर तो तातडीने थायलंडला पळून गेला होता. मात्र, शुक्रवारी सकाळी तो मुंबई विमानतळावर उतरताच पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या.

असल्याचे तपासात उघड झाले आहे. पोलिसांनी या तरुणीच्या बँक खात्यातून 50 लाख रुपयांची बेहिशोबी रक्कम जप्त केली असून, या ह्यडिजिटल मनी ट्रेलह्मुळे या रॅकेटचे जाळे किती खोलवर पसरले आहे, याचा पदार्फाश झाला आहे.

गर्लफ्रेंडच्या खात्याचा असा व्हायचा वापर

या प्रकरणात पोलिसांनी यापूर्वी जिया जेकब नावाच्या तरुणीला अटक केली होती, जी मीरा रोड येथे खेमलानीसोबत राहत होती. तपासादरम्यान असे दिसून आले की जियाच्या बँक खात्याचा वापर ड्रग्जच्या व्यवहारांसाठी केला जात होता. अटकेच्या वेळी तिच्या खात्यात सुमारे 50 लाख रुपये जमा होते, ज्याबद्दल ती समाधानकारक उत्तर देऊ शकली नाही. तिने कबुली दिली की, तिचा पेमेंट क्यूआर कोड खेमलानीकडे असायचा आणि तोच ग्राहकांकडून पैसे घेण्यासाठी याचा वापर करायचा.

आंतरराष्ट्रीय कनेक्शनची शक्यता

खेमलानी हा मूळचा हाँगकाँगचा रहिवासी असून त्याच्याकडे थायलंडचे नागरिकत्व असल्याचीही शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. तो परदेशात पळून गेल्याची माहिती मिळताच त्याच्याविरुद्ध लुकआउट सर्कुलर जारी करण्यात आले होते. शुक्रवारी तो विमानतळावर येताच यंत्रणेने अलर्ट दिला आणि मुंबई पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. 11 एप्रिलच्या त्या दुर्दैवी घटनेनंतर पोलिसांनी या प्रकरणाचा धागादोरा पकडत आतापर्यंत एकूण 12 जणांना अटक केली आहे. हे ड्रग्ज आंतरराष्ट्रीय स्तरावरून तस्करी करून भारतात आणले जात होते का, याचा तपास आता पोलीस करत आहेत.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com